REGISTERED No. B 3434.


डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात


# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २४ सप्टेंबर १९४७ अंक ३९



दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,०५,५५५ |
| खेळतें भांडवल | रु. | ६१,००,००० |

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे. "

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एल्एल्. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर





सारस्वत
को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

टे. नं. ३१६७५ ३१–५–१९४७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. | ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. | ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. | ३,९७,२४० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. | २,०४,००० |
| ठेवी ... | रु. | ६९,७३,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. | ७६,७५,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम

व्याज : २ टक्के

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

— विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा —

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को–ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली ) ● स्थापना १९११

—मुख्य कचेरी—

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५१

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | २०,१४,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | २५,६५,००० रु. |

खेळतें भांडवल ७ कोटी रुपयांवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

# विविध माहिती

**रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती**—रिझर्व्ह बँकेस कायद्याचीं कडक बंधनें असल्या कारणानें, ती गरजू बँकांस वेळेवर पुरेसें सहाय्य करूं शकत नाहीं, अशी फार जुनी तक्रार आहे. रिझर्व्ह बँक कायद्याच्या १७ व्या कलमांत, बँकेनें शेड्युल्ड बँकांना कोणत्या तारणावर व अटींवर कर्जे द्यावींत, ह्याचा खुलासा केलेला आहे. ह्या कलमानें, बँकेचा कर्ज देण्याचा अधिकार अतिशय मर्यादित केलेला असून अडचणीचे प्रसंगीं तो अधिकार उपयोगी पडूं शकत नाहीं असा अनुभव आहे. हें १७ वें कलम एक ऑर्डिनन्स काढून दुरुस्त करण्यासाठी सरकारनें ऑर्डिनन्स काढला आहे. ज्या तारणावर बँकांनीं आपल्या कर्जदारांस कर्जे दिलीं असतील त्या तारणांच्या आधारावर रिझर्व्ह बँकेस इतर कोणत्याही बँकांस पैसे कर्जाऊ देणें शक्य व्हावें, असा ह्या दुरुस्तीचा उद्देश आहे.

**पांच रुपयांच्या नवीन नोटा**—रिझर्व बँक ऑफ इंडिया ५ रुपयांच्या नवीन छपाईच्या नोटा लवकरच काढणार आहे. ह्या छपाईचा नमुना रिझर्व बँकेच्या कायद्याच्या २५ व्या कलमानुसार मध्यवर्ती सरकारनें संमत केला आहे.

**बँकेची टाळेबंदी संपली**—कलकत्ता येथील इंपिरिअल बँकेची टाळेबंदी ४ दिवस चालून नंतर बंद झाली. ह्या चारी दिवस बँकेचा नोकरवर्ग कामावर येतच होता. परंतु तो संपावर जाईल ह्या भीतीनें अधिकाऱ्यांनीं हिशोबाचीं पुस्तकेंच कुलपांत टाकलीं होतीं. नोकरवर्गाच्या गाऱ्हाण्यांबाबत चौकशी चालू आहे.

**कर्ज तडजोड बोर्डाच्या अधिकाराची सीमा**—मुंबई प्रांतांत नेमण्यांत आलेल्या शेतकरी-कर्ज-तडजोड-बोर्डाकडे कोणाला दाद मागतां येते, ह्यासंबंधी एक महत्त्वाचा निर्णय सुरत येथील सेशन्स जज्जांनीं दिला आहे. एकाद्या शेतकऱ्याचें कायमचें वसतिस्थान मुंबई प्रांतांत नसलें, पण तो जर बोर्डाच्या कक्षेंतील भागांत शेतीनें उपजीविका करीत असेल अगर शेतांत अंगमेहनत करीत असेल, तर त्याला बोर्डाकडे कर्ज तडजोडीसाठीं अर्ज करतां येतो, असा हा निर्णय आहे.

**साखरेच्या व्यापाऱ्यांना नुकसान भरपाई**—ऑक्टोबर २३, १९४६ पासून सरकारनें साखरेच्या कारखान्यांच्या ठिकाणीं साखरेचा भाव दर मणामागे ४ रु. ४ आण्यांनीं वाढविला. त्या तारखेपूर्वीच्या भावानें ज्यांनीं साखर विकली त्यांना नुकसानभरपाई देण्याचा सरकारचा विचार आहे.

**पाऊस पाडण्याचा प्रयत्न**—ऑस्ट्रेलिआच्या शास्त्रीय संशोधन समितीनें पाऊस पाडण्यासाठी एक नवा प्रयोग करण्याचें ठरविलें आहे. ढगावर कॅलशियम क्लोराइडचें मिश्रित असें कांहीं रासायनिक द्रव्य टाकून पाहिजे तेव्हां पाऊस पाडता येईल असा समितीचा अंदाज आहे.

**साऊथ इंडिअन रेल्वे**—मद्रास ते चिंगलपट ह्या रेल्वेरस्त्यावरील ३० मैलांची वहातूक विजेच्या सहायानें करण्याचें काम १९५२ मध्यें पुरें होईल, असें समजतें. ह्या सुधारणेमुळें कोळशाची वहातूक सुलभ होणार आहे.

**ब्रिटिश साम्राज्याचें औद्योगीकरण**—अमेरिकेंतील एका व्यापार विषयक संशोधन संस्थेनें ब्रिटिश साम्राज्याच्या युद्धकालीन औद्योगीकरणाविषयीं पुढीलप्रमाणें मत व्यक्त केलें आहेः—" युद्धकालांत ब्रिटिश साम्राज्यांतील देशांत औद्योगीकरणाचा विस्तार झाल्यामुळें ब्रिटन व अमेरिका ह्यांच्या निर्यात व्यापारावर चांगलाच परिणाम होणार आहे. युद्धापूर्वी अमेरिकन निर्यातीपैकीं ४० टक्के निर्यात ब्रिटिश साम्राज्याकडे होत असे. हिंदुस्थान व इतर वसाहती ब्रिटिश निर्यातीचे महत्त्वाचे देश होते. पण हिंदुस्थान अगर वसाहती ह्यांना आता पूर्वीच्याच प्रकारचा औद्योगिक माल लागेल कीं नाहीं ह्यांची शंकाच आहे. ऑस्ट्रेलिआ आणि कॅनडा ह्या देशांत लोखंड, पोलाद, यंत्रसामुग्री, वहातुकीचीं साधनें व रसायनें यांच्या उत्पादनाची वाढ युद्धकालांत झपाट्यानें झाली. वरील दोन्ही देश आतां अवजड यांत्रिक हत्यारांच्या बाबतींत जवळ जवळ स्वयंपूर्ण झाले आहेत.

**सर एम्. विश्वेश्वर अय्या ह्यांस पंच नेमलें**—तुंगभद्रेवरील धरणाच्या बांधकामाचे तपशीलाबाबत मद्रास व हैद्राबाद ह्यांचें सरकारांत वांधा निर्माण झाला आहे. सिमेंट वापरावें का सुर्की चुना वापरावा, ह्याबद्दल मतभेद आहे. तुंगभद्रा नदीवर बल्लारी जिल्ह्यांत हॉस्पेट शेजारीं मल्लापुरम येथें हें धरण बांधलें जाऊन त्यास २० कोटी रुपये खर्च येणार आहे. वांध्याचा निवाडा करण्यासाठीं दोन्ही सरकारांनीं सर मोक्षगुंडम् विश्वेश्वर अय्या ह्यांस पंच नेमलें आहे.

**मद्रास सरकार जमीनदारी नष्ट करणार**—आपल्या प्रांतांतील जमीनदारी नष्ट करून रयतवारी सुरू करण्यासाठीं मद्रास प्रांतिक सरकारनें एक बिल तयार केलें आहे. सर्व जमीनदारीस मिळून एकूण १० कोटि रु. नुकसान भरपाई दिली जाईल. जमिनीवर सरकारची मालकी झाल्यावर सरकारचें वार्षिक उत्पन्न १ कोटि रुपयांनीं वाढेल, असा अंदाज आहे.

**फाळणी झाली, तरी वर्गणी कायम**—इंटरनॅशनल बँकेच्या खर्चासाठीं प्रत्येक सभासद-राष्ट्रास दरसाल वर्गणी द्यावी लागते. हिंदुस्थानाची फाळणी होऊन त्याचीं दोन राष्ट्रें बनलीं असलीं तरी आपणांस पूर्वीप्रमाणेंच वर्गणी भरीत रहावी लागणार आहे.

**मद्रास बस सर्व्हिसमध्यें फायदा**—मद्रास शहरांतील बस वहातुक प्रांतिक सरकारनें आपल्या मालकीची केल्यापासूनच्या दोन महिन्यांत सरकारला सुमारें ४६ हजार रुपये निव्वळ फायदा झाला, असें सरकारच्या वहातूक मंत्र्यांनीं जाहीर केलें.

**वर्ल्ड बँक व मॉनेटरी फंड**—ह्या संस्थेच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सच्या चार उपाध्यक्षांची निवडणूक नुकतीच झाली. चार उपाध्यक्षांपैकीं एक श्री. एन्. सुदर्शन हे हिंदी गृहस्थ आहेत. श्री. सुदर्शन हे वॉशिंग्टन येथील हिंदी वकिलातीचे सल्लागार आहेत.

**बडोद्यांत विमानांचा कारखाना**—बडोदा येथें विमानांचा व ग्लायडर्सचा एक कारखाना काढण्याचा बडोदे सरकारचा विचार आहे. ह्या कारखान्याला १० लाख रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज आहे. कारखान्याचा तज्ज्ञ एक जर्मन एंजिनिअर आहे.

**डेनमार्क-अमेरिका करार**—ग्रीनलंडच्या संरक्षणासंबंधीं अमेरिकन व डॅनिश सरकार ह्यांच्यांत वाटाघाटी चालू असल्याचें अमेरिकेच्या परराष्ट्रीय खात्यातर्फे जाहीर करण्यांत आलें आहे.

**कानपूर वीज कंपनीचें राष्ट्रीयीकरण**—मूलभूत उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याच्या आपल्या धोरणास अनुसरून संयुक्त-प्रांत सरकारनें कानपूर इलेक्ट्रिक सप्लाय कॉर्पोरेशनचा ताबा नुकताच बेग सदरलँड आणि कंपनीकडून घेतला. संयुक्त-प्रांत सरकारनें कारखान्याच्या किंमतीपैकीं पहिला हप्ता म्हणून १,३३,५०,००० रुपयांचा चेक दिला.

**चिनी डॉलरची किंमत मातीमोल!**—चीनमधील अन्नाच्या व इतर वस्तूंच्या किंमती वाढत चालल्यामुळें एका अमेरिकन डॉलरसाठीं हुंडणावळीच्या काळ्या बाजारांत ४७,००० चिनी डॉलर्स द्यावे लागत आहेत! गेल्या कित्येक आठवड्यांत चिनी डॉलर्सचा भाव इतका घसरला नव्हता.

# अर्थ

बुधवार, ता. २४ सप्टेंबर, १९४७




प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. स. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## सहकारी चळवळीची हिंदुस्थानांतील प्रगति

रिझर्व बँक ऑफ इंडिआच्या अॅग्रिकल्चरल क्रेडिट खात्यातर्फे हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीसंबंधीं कांहीं उद्बोधक आकडेवार माहिति प्रसिद्ध करण्यांत आली आहे. ह्या माहितींत १९४३–४४ आणि १९४४–४५ सालीं सहकारी चळवळीनें केलेल्या प्रगतीचा प्रामुख्यानें विचार करण्यांत आला आहे. १९०६–७ ते १९०९–१० ह्या चार वर्षांत हिंदुस्थानांतील सहकारी संस्थांची सरासरी संख्या फक्त १,९२६ इतकी होती. ह्या संस्थांत सेंट्रल आणि प्रॉव्हिन्शिअल बँका, सुपरव्हायझिंग आणि गॅरंटीइंग युनिअन्स, लँड मार्टगेज आणि इतर शेतकीविषयक पतीच्या संस्था व बिगर शेतीविषयक सहकारी संस्था अशा सर्व प्रकारच्या संस्थांचा समावेश होतो. १९१०–११ ते १९१४–१५ ह्या पांच वर्षांच्या काळांत ही सरासरी संख्या ११,७८६ एवढी झाली. सहकारी संस्थांच्या संख्येंत होणारी वाढ अशीच चालू राहून १९४० च्या सुमारास सहकारी संस्थांचा आंकडा १,००,००० वर किंवा नक्की आंकडा सांगावयाचा तर १,१६,९६० इतका झाला होता. १९४१ सालीं सहकारी संस्थांचा आंकडा १,४५,४२४ पर्यंत वाढला. १९४३–४४ सालीं १,५५,७०६ येवढ्या एकंदर सहकारी संस्था होत्या आणि १९४५ सालीं त्या १,५९,६३३ इतक्या झाल्या. १९४३–४४ ते १९४४–४५ ह्या काळांतील वाढीची अधिक तपशीलवार माहिति पुढील तक्त्यांत दिली आहे.

**सहकारी संस्थांची वाढ**

| | १९४३–४४ | | | १९४४–४५ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ब्रिटिश हिंदुस्थान | संस्थानें | एकूण संख्या | ब्रिटिश हिंदुस्थान | संस्थानें | एकूण संख्या |
| लोकसंख्या ( आंकडे लाखाचे ) ... | ३०३५ | ५९१ | ३६२६ | ३०६३ | ६०२ | ३६६५ |
| प्रॉव्हिन्शिअल व सेंट्रल बँका आणि युनिअन्स ... ... ... | ४८३ | १२८ | ६११ | ४८० | १३३ | ६१३ |
| सुपरव्हायझिंग आणि गॅरंटीइंग युनिअन्स ... ... ... | ३८९ | ३६ | ४२५ | ३९६ | ३६ | ४३२ |
| लँड मॉर्टगेज बँका आणि इतर सहकारी संस्था ... ... ... | १,१४,००४ | २१,०८२ | १,३५,०८६ | १,१४,५३४ | २२,११३ | १,३६,६४७ |
| बिगर–शेतकी संस्था ... ... | १५,६७४ | ३,९१० | १९,५८४ | १७,९३४ | ४,००७ | २१,९४१ |
| एकूण संस्था ... ... ... | १,३०,५५० | २५,१५६ | १,५५,७०६ | १,३३,३४४ | २६,२८९ | १,५९,६३३ |
| प्रत्येक लाख लोकसंख्येशीं संस्थांचें प्रमाण ... ... ... | ४३ | ४२·६ | ४२·९ | ४३·५ | ४३·७ | ४३·६ |

सहकारी संस्थांच्या सभासदांच्या संख्येंतही अशीच वाढ उत्तरोत्तर झालेली दृष्टीस पडते. १९०६–७ ते १९०९–१० ह्या चार वर्षांत प्राथमिक संस्थांतील एकूण सभासदांची सरासरी संख्या फक्त १,६१,९१० भरली. हीच सरासरी दहा वर्षांनंतर ११,२८,९६१ इतकी झाली. १९३० सालीं सभासद संख्या ३६,८८,८४१ झाली, १९४० सालीं ५०,७६,७४२ झाली; १९४३–४४ सालीं ७६,८५,८२० झाली आणि १९४४–४५ सालीं ८३,५५,१८० झाली. ह्यावरून सर्व देशभर सहकारी चळवळीची लोकप्रियता दिसून येते. सहकारी संस्थांच्या खेळत्या भांडवलाचे आंकडे तर ह्याहून अधिक बोधप्रद आहेत. ते पुढील पृष्ठावर तक्त्यांत दिले आहेत.

१९४३–४४ सालीं प्रॉव्हिन्शिअल व सेंट्रल बँकांची संख्या ६११ होती ती १९४४–४५ सालीं ६१३ झाली. १९४२-४३ सालीं ही संख्या ५९९ होती. १९४२–४३, १९४३–४४, १९४४–४५ ह्या वर्षी सभासद संख्येंत अनुक्रमें पुढील प्रमाणें वाढ झाली. ४२–४३—२,१५,०००; ४३–४४—२,२४,०००; ४४-४५—२,२६,०००. खेळत्या भांडवलामध्यें पुढील प्रमाणें वाढ झाली. ४२–४३—५०,३३,००० रु. ४३–४४— ५५,३३,००० रु. ४४–४५—६०,४०,००० रु. शेतकी–सहकारी संस्थांचीही अशीच वाढ झाल्याचें दिसून येतें. ह्या संस्था ४२–४३ मध्यें १,२६,०३४ होत्या. ४३–४४ सालीं १३४,८०१, झाल्या आणि ४४–४५ सालीं १,३६,३५८ झाल्या. लँड मॉर्टगेज बँकांची व इतर संस्थांचीही वाढ झाल्याचें लक्षांत येते. त्यांची आंकडेवारी अशी. ४२–४३—२७१; ४३–४४—२८५ व ४४-४५—२८९. बिगर शेतकी विषय संस्थांची संख्याः—४२–४३—१८,८०२; ४३–४४—१९,५६७ व ४४–४५—२१,९२४.

रिझर्व बँकेच्या अॅ. क्रे. खात्यानें "हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीची ३० वर्षें, १९१४–१५ ते १९४४–४५" ह्या शीर्षकाची एक पुरवणीही काढली असून तींत नकाशे व चित्रें देण्यांत आलीं आहेत सहकारी चळवळींत भाग घेणारांना व अभ्यासकांना वरील दोन्हीही माहितिपत्रकें उपयुक्त ठरल्यासेरीज रहाणार नाहींत.

### खेळतें भांडवल

| | १९४३–४४ | | | १९४४–४५ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ब्रिटिश हिंदुस्थान | संस्थानें | एकूण संख्या | ब्रिटिश हिंदुस्थान | संस्थानें | एकूण संख्या |
| लोकसंख्या ( आंकडे लक्षाचे ) | ३०३१ | ५९१ | ३०२६ | ३०६३ | ६०२ | ३६६५ |
| | | | हजार | रुपयांचे | आंकडे | आहेत |
| वसूल भांडवल | १४,७०,५४ | २,८३,४१ | १७,५३,९५ | १६,९२,५३ | ३,२८,०८ | २०,२०,६१ |
| **कर्जें व ठेवी, कोणाकडून** | | | | | | |
| सभासद | १२,०८,६४ | २,३३,६४ | १४,४२,६३ | १५,७०,८५ | २,८५,१० | १८,५५,९५ |
| संस्था | ८,४१,६४ | ८३,९९ | ९,२५,६३ | ९,८४,१७ | ९८,०४ | १०,८२,२१ |
| प्रॉव्हिन्शिअल व सेंट्रल बँका | २०,७१,२४ | १,७३,५८ | २२,४४,८२ | २१,९१,२८ | १,४६,१८ | २३,३७,४६ |
| सरकार | १,०६,३९ | ७५,४१ | १,८१,८० | ६९,५० | ७२,९० | १,४२,४० |
| बिगर सभासद आणि इतर | ३४,७२,०४ | ३,७३,७६ | ३८,४५,८० | ३७,९२,९० | ३,९८,१४ | ४१,९१,०४ |
| **लँड मॉर्टगेज बँकांनीं व सोसायट्यांनीं काढलेलीं कर्जें** | ६,१८,९३ | ६०,७९ | ६,७९,७२ | ६,३७,३४ | ६२,५५ | ६,९९,८९ |
| रिझर्व्ह फंड | १२,१४,८१ | १,९३,४६ | १४,०८,२७ | १२,८६,१० | २,०९,८९ | १४,९५,९९ |
| इतर फंड | ६,३०,७३ | १,०८,१२ | ७,३८,८५ | ७,१७,५५ | १,२०,२८ | ८,३७,८३ |
| एकूण | १,१६,३४,९६ | १५,८६,५१ | १,३२,२१,४७ | १,२९,४२,२२ | १७,२१,१६ | १,४६,६३,३८ |
| दर डोई प्रमाण (आणे) | ६१ | ४३ | ५८ | ६७·६ | ४५·८ | ६४·० |

### इजिप्तमधील नवा कंपनी कायदा—उद्योगधंद्यांतून परकीयांचें उच्चाटन ?

इजिप्तचा नवा कंपनी कायदा लवकरच अंमलांत येणार आहे. त्यांतील कांहीं कलमें उद्बोधक आहेत. इजिप्तमध्यें व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या वाढीस उत्तेजन देणें हा त्या कायद्याचा उद्देश आहे. विदेशी कंपन्यांना तो चांगलाच जाचक ठरणार आहे. कारण, प्रत्येक कंपनीच्या डायरेक्टरांपैकी किमान ४०% डायरेक्टर इजिप्तचे नागरिक असले पाहिजेत आणि ही सुधारणा कायदा प्रसिद्ध झाल्यापासून तीन महिन्यांचे आंत घडवून आणली पाहिजे. अशा तऱ्हेचा निर्बंध आंतरराष्ट्रीय रूढीस धरून नाहीं, अशी लंडनमध्यें टीका करण्यांत येत आहे. कंपनीच्या नोकरांपैकीं किमान ७५% नोकर इजिप्तचे नागरिक पाहिजेत आणि कंपनी देत असलेल्या एकूण वेतनाच्या व भत्त्याच्या किमान ६५% इतकी रकम त्यांच्या वाट्यास आली पाहिजे. कंपनीच्या मजुरांपैकीं ९०% मजूर इजिप्शन पाहिजेत आणि मजुरीच्या रकमेपैकीं किमान ८०% मजुरी त्यांस मिळाली पाहिजे. हें घडवून आणण्यास कंपन्यांना तीन महिने मुदत देण्यांत आली आहे. इजिप्तमध्यें स्थापन झालेल्या कंपन्यांसच केवळ हे निर्बंध लागू आहेत असें नसून बाहेरच्या कंपन्यांच्या इजिप्तमधील शाखांस व कचेऱ्यांसही ते पाळावे लागणार आहेत. कंपनीच्या शेअर भांडवलापैकी ५१% शेअर्स इजिप्तच्या नागरिकांसाठीं राखून ठेवले पाहिजेत. कायद्याच्या अंमलबजावणीसाठीं सरकारच्या व्यापारी व औद्योगिक खात्यास व्यापक अधिकार देण्यांत आले आहेत.

**"ऑस्ट्रेलिया श्वेतवर्णीयांसाठींच"**—"आम्ही श्वेतवर्णीयांखेरीज इतरांना ऑस्ट्रेलिआंत कधींच येऊं देणार नाहीं. ऑस्ट्रेलियांत सध्या वन्य जातीचे ६० हजार स्थानिक लोक आहेत, परंतु ती जात नष्ट होत चाललीच आहे." ऑस्ट्रेलियन मजूर पक्षाचे चिटणीस, मि. पॅट्रिक केनेले, ह्यांनीं आपल्या पक्षाच्या परिषदेंत वरील प्रकारचे उद्गार काढले.

### पंजाबमधील दंग्यांचा बँकांवर परिणाम

पंजाबमधील जातीय दंग्यांचा तेथील बँकांवर काय परिणाम झाला आहे, हें अद्याप बाहेर आलेलें नाहीं. मुंबईतील एका मोठ्या बँकेनें कांहीं पारशी अधिकारी व कारकून पश्चिम पंजाबांत पाठवून, बँकेच्या शाखांची प्रत्यक्ष परिस्थिति समजून घेण्याचा प्रयत्न चालविला आहे. रिझर्व्ह बँकेच्या लाहोर येथील कचेरींतील ४५० लोकांपैकीं फक्त ५० च कामावर आहेत, ह्यावरून इतर बँकांच्या परिस्थितीची कल्पना येईल. बहुतेक बँकांचें काम बंदच पडलें असलें पाहिजे. पंजाबमध्यें दंगे होतील, हें अगोदरच ओळखून तेथील बँकांनीं गेले कांहीं महिने नवीं कर्जें देण्याचें बंद केलें होतें व जुन्या कर्जांची वसुली चालविली होती. ह्या सावधगिरीमुळें, बँकांवर मोठें गंडांतर येणार नाहीं, अशी अपेक्षा आहे. तेथील कोणत्याहि बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे मदतीची मागणी केलेली नाहीं, असें समजतें.

**झेक राष्ट्राला जर्मनीची भीति**—झेकोस्लोव्हाकिआनें मध्य-युरोपांतील राष्ट्रांशीं केलेले तह जर्मनीच्या आक्रमणापासून त्या राष्ट्रांचें रक्षण करण्याच्या दृष्टीनें समर्थनीय आहेत, असें त्या राष्ट्राच्या उप-परराष्ट्रमंत्र्यानें नुकतेंच जाहीर केलें. हें समर्थन करतांना जर्मनीचा आणि जर्मनीशीं संगनमत करणाऱ्या पक्षांचा त्यांनीं केलेला उल्लेख युरोपमधील सध्याच्या राजकारणाच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे.

**दिल्लीमधील कचेऱ्या रविवारींहि चालू राहणार**—दिल्लीमधील सर्व कचेऱ्या आतां सुटीच्या दिवशींहि कामें करतील. रविवारींहि सुटी मिळणार नाहीं. महत्त्वाचीं कामें त्वरेनें पुरीं व्हावींत, ह्यासाठीं ही योजना आहे.

**मद्रास प्रांतांत विक्रीकरांत वाढ**—मद्रास प्रांतिक सरकारनें विक्री कर रुपयांस २ पै आहे तो ३ पै करण्याचें ठरविलें आहे. दारूबंदीमुळें होणारें नुकसान भरून काढण्यासाठी ही योजना आहे. तिचेमुळें विक्रीकराचे उत्पन्नांत ३½ कोटींची भर पडून त्याचें उत्पन्न १०½ कोटींवर जाईल.

## अमेरिकेची आर्थिक परिस्थिति

### पुनर्घटनेच्या योजनांमागील कारवाईचें स्वरूप

लेखकः-प्रो. स. वा. कोगेकर, बी. ए. ( मुंबई ), बी. एससी. ( अर्थ ) ( लं. )

अमेरिकेच्या उत्पादनांत युद्धकालांत दुपटीनें वाढ झाली. ती सतत टिकविण्यासाठीं अमेरिकेच्या मालाला स्वदेशांत आणि परदेशांत गिऱ्हाईक मिळण्याची आवश्यकता आहे. स्वदेशांत खपणाऱ्या मालाचा उठाव जास्त प्रमाणांत व्हावयाचा असल्यास किंमती स्थिर ठेऊन मजुरी, पगार, वगैरेंत वाढ केली पाहिजे. पण तसें करण्यानें नफा कमी होण्याचा प्रसंग येईल. त्यामुळें मजुरींत वाढ करणें अमेरिकन उद्योगपतींस परवडत नाहीं. उलट, किंमतीवरील नियंत्रण सैल करून वाढणाऱ्या भावांतून अधिक फायदा मिळविण्याकडे त्यांची प्रवृत्ति आहे. त्याचाच परिणाम किंमतींत वाढ होण्यांत झाला असल्याचें दिसून येतें. युद्धाच्या शेवटीं घाऊक किंमतींचा निर्देशांक १०६ होता तो गेल्या डिसेंबरांत १४१ वर गेला आणि नंतर त्याहूनही तो वाढला आहे. चालू वर्षाच्या मार्च महिन्यांत तो १५० वर गेला होता. अजूनही किमती स्थिर होण्याचें चिन्ह दिसत नसल्यामुळें मजूरवर्गांत असंतोष पसरलेला आहे. युद्धाच्या शेवटी असलेला रहाणीच्या खर्चाचा १२८ हा निर्देशांक या वर्षाच्या सुरवातीला १५१ वर गेला व तेव्हापासून तो वाढतच आहे. अमेरिकेच्या घरगुती व्यापारांत घट येण्यासारखी ही परिस्थिति आहे. त्यावर तोडगा म्हणून परदेशी व्यापारांत वाढ करावी म्हटलें तर ती गोष्टही कठीण होऊन बसलेली आहे. कारण, युद्धामुळें युरोपांतील अमेरिकेच्या बाजारपेठांची दुर्दशा उडाली. ती सुधारून घेऊन पुनः माल विकत घेण्याइतकी क्रयशक्ति आज या देशांजवळ नाहीं. माल आहे, पण तो विकत घेण्यासाठीं डॉलर नाहींत व ते मिळविण्याचें साधन जें निर्यात तें उत्पादनाच्या अभावीं उपलब्ध नाहीं, अशी परिस्थिति निर्माण झाली आहे.

### मार्शल योजनेविषयीं शंका

डॉलरच्या तुटवड्याचा परिणाम असा झाला आहे कीं जगांतील राष्ट्रांना आपल्या आर्थिक पुनर्घटनेसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री मिळवितां येत नाहीं. इंग्लंडसारख्या देशास तर नित्योपयोगी अन्न व कच्चा माल यांची आयात करणेंही मुष्कील होऊं लागलें आहे. एकीकडे ही अन्नान्न दशा झाली असतां तिकडे अमेरिकेंत मात्र गिऱ्हाइक नाहीं म्हणून माल पडून राहील अशी काळजी वाटूं लागली आहे. या परिस्थितींतून मार्ग काढण्यासाठी अमेरिकेचे परराष्ट्र-मंत्री मि. मार्शल यांनीं मोठ्या प्रमाणावर कर्जें देऊन युरोपांतील देशांची आर्थिक पुनर्घटना करण्यास मदत करावी व त्याच बरोबर अमेरिकन मालाला गिऱ्हाइक उभें करावें अशी एक योजना पुढें मांडली आहे. या योजनेप्रमाणें युरोपांतील इंग्लंड,फ्रान्स यांच्या नेतृत्वाखालील १६ राष्ट्रांची एक परिषद भरून अमेरिकेकडून मिळावयाच्या मदतीसंबंधीं तपशीलवार विचार चालू झाला आहे. युरोपांतील रशिया व झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, फिनलंड, इत्यादि ८ राष्ट्रांनीं या परिषदेंत सहभागी होण्याचें नाकारलें आहे. कारण, अमेरिकेनें ज्या अटींवर ही मदत मिळेल असें जाहीर केलें होतें त्यामुळें या राष्ट्रांत यापूर्वीच सुरू केलेल्या पुनर्घटनेच्या योजनांना बाध येण्याचा संभव होता. बाकीच्या १६ राष्ट्रांच्या वतीनें तयार करण्यांत आलेल्या मसुद्यावर अमेरिकन उप-अर्थमंत्रि मि. क्लेटन यांनीं जी टीका गेल्या आठवड्यांत केली तीमुळें रशिया वगैरे राष्ट्रांनीं प्रदर्शित केलेल्या शंकेला दुजोराच मिळालेला आहे. मि. क्लेटन यांनीं सांगितलें कीं १६ राष्ट्रें जी योजना करतील तिला अमेरिकेची पसंती लागेल आणि ही देतांना अमेरिकेकडून मिळणारी मदत प्रत्यक्ष कशी वापरली जाते, हें पहाण्याचा अधिकारहि अमेरिका मागेल. म्हणजेच युरोपची पुनर्घटना अमेरिकेच्या देखरेखीखालीं होणार.

कर्ज देणाऱ्या सावकारानें कर्जाचा विनियोग कसा केला जातो याकडे इतकें बारकाईनें पहाण्याचें कारण काय ? असा प्रश्न कित्येकांच्या मनांत येईल. पण त्याचें उत्तर सोपें आहे. अमेरिकेचा प्रश्न आज आपल्या मालाला गिऱ्हाईक कसें मिळेल इतका संकुचित नाहीं. तर उद्यां युरोपांतील देशांत तयार होणारा माल आपल्या मालाशीं स्पर्धा करूं लागला तर काय होईल याचाहि तिला विचार करावा लागतो. त्यासाठीच युरोपच्या पुनर्घटनेमुळें आपल्या भावी व्यापाराला शक्य तितका कमी अडथळा येईल अशी व्यवस्था अमेरिका करूं पहात आहे. तसेंच मागें पुढें होणाऱ्या रशियाविरोधी युद्धाची तयारी करण्याच्या दृष्टीनेही युरोपचा उपयोग आपणास व्हावा असें वाटत असल्यामुळें त्या दृष्टीनेंहि विशिष्ट योजना या पुनर्घटनेच्या नांवाखालीं युरोपांतील राष्ट्रांवर लादण्याची तिची कारवाई आहे.

### मंदी पुढें ढकलण्याचा प्रयत्न

अमेरिकेकडून मिळावयाच्या कर्जाची रक्कम केवढी असेल त्याविषयीं बरेच तर्क करण्यांत आले आहेत. २ ते ३ हजार कोटी डॉलरच्या दरम्यान ही रक्कम जाईल असें दिसतें. १९४५-४६ सालांत अमेरिकेच्या निर्यात व्यापाराची किंमत ९२७ कोटी डॉलर होती. पांच वर्षांत युरोपला मदत म्हणून एकंदर २ हजार कोटी डॉलर देण्याचें अमेरिकेनें मान्य केल्यास दरसाल सरासरी ४०० कोटी डॉलरची निर्यात या प्रकारें अमेरिकेला करतां येईल. आजची निर्यात जागतिक डॉलर तुटीमुळें टिकविणें अशक्य असल्यामुळें या रीतीनें अमेरिका आपली तेजी कशीबशी टिकविण्याचा प्रयत्न करूं पहात आहे. परंतु येवढ्यानें भागेल असें दिसत नाहीं. कारण, यंदाच्या वर्षी ७०० कोट डॉलर किमतीचीं कर्जें वा अन्य मदत जगांतील देशांना दिल्याशिवाय अमेरिकेला आपला निर्यात व्यापार टिकवितां येणार नाहीं असा अंदाज करण्यांत आला आहे. शिवाय, अशा तऱ्हेनें कर्जें देणें अमेरिकेला किती काळ शक्य आहे हाहि प्रश्नच आहे. आज ना उद्यां हीं कर्जें थांबवावींच लागतील आणि त्यावेळी पुन्हा डॉलरच्या अभावी अमेरिकन माल गिऱ्हाइकाची वाट पहात पडून राहील. अमेरिकन मालाला ब्रिटन वगैरे देशांतील मालाशी टक्कर द्यावी लागणार असल्यामुळें व कांहीं बाजारपेठ तरी ब्रिटन वगैरे इतर देशांना हस्तगत करणें शक्य असल्यामुळें अमेरिकेच्या निर्यातींत अधिकच घट होईल. तसें झाल्यास आर्थिक मंदीची छाया पसरण्यास वेळ लागणार नाहीं आणि एकदा का मंदीची घसरगुंडी सुरू झाली की ती हां हां म्हणता सर्वत्र पसरून चोहोंकडे बेकारी माजल्याशिवाय राहाणार नाहीं. या आपत्तीची जाणीव आज अमेरिकन उद्योगपतींना आहे. पण त्यावर उपाय करण्याऐवजीं सरकारच्या मदतीनें ती पुढें ढकलण्याचाच प्रयत्न आज होत आहे. 'मिळेल तोपर्यंत हात मारून घ्या' या विचारानें किंमतीतील वाढ आणि मजूरसंघटनावरील नियंत्रणें यांचाच प्रचार सर्वत्र सुरू आहे. पण किमतींत भरमसाट वाढ झाली तर त्या किमतीस माल घेणें न परवडल्यामुळें मंदीचा काळ अधिक जवळ मात्र येणार आहे.

### अमेरिकेविषयीं वैषम्य

डॉलरची तूट मार्शल योजनेनें कांहींशी भरून येण्यास मदत होणार असली तरी आज ना उद्यां अमेरिकेच्या मदतीशिवाय

आपण आपल्या पायावर उभे रहाणें आवश्यक आहे याची जाणीव इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांनाही आहे. त्या दृष्टीनें डॉलरवरचें परावलंबित्व शक्य तितकें कमी करण्याच्या त्यांच्या योजना चाल आहेत. इंग्लंडनें नुकतीच आपल्या निर्यात वाढीची योजना हातीं घेतली असून १९४८ च्या अखेरीस युद्धपूर्वकालापेक्षां ६० टक्के आधिक किंमतीचा माल परदेशी रवाना करण्याचें ठरविलें आहे. तसेंच साम्राज्यांतर्गत जकात सवलतीच्या पद्धतीचा जोराचा पुरस्कारही सुरू झाला आहे. मध्यंतरीं, परराष्ट्रमंत्री मि. बेव्हिन यांनीं अमेरिकेनें आपला सुवर्णाचा सांठा युरोपांतील राष्ट्रांत वांटून टाकावा आणि त्यायोगें क्रयशक्ति निर्माण करावी अशीही एक सूचना पुढें मांडली. त्यावरून अमेरिकेची मदत घेणें आज जरी अपरिहार्य असलें तरी युद्धांत मिळालेल्या यशाचा सगळा आर्थिक फायदा अमेरिकेनें उचलल्याबद्दलचें वैषम्य आज ब्रिटनमध्यें किती तीव्रतेनें वाटत आहे तें दिसून येतें.

### मुंबई प्रां. सहकारी बँक लि.

अहवालाचे वर्षीं बँकेकडील ठेवींत ४३लक्ष रुपयांची घट झाली. परंतु, शेतीच्या उत्पादनाचा खर्च वाढल्यामुळें आणि सावकारी नियंत्रणाच्या आगामी कायद्यानें इतर ठिकाणीं कर्जें मिळणें दुर्घट केल्यामुळें, सोसायट्यांकडील कर्ज मागणी वाढली. कंट्रोल व रेशनखालील जिनसांचें वाटप सहकारी संस्थांकडे येऊं लागलें आणि परचेस व सेल सोसायट्यांची व इतरांची मागणी वाढली. सेंट्रल व अर्बन बँकांनींहि सरकारी रोख्यांचे तारणावर ज्यास्त कर्जमागणी केली. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे, मुंबई प्रां. सहकारी बँकेची सहकारी संस्थांस दिलेल्या कर्जांतील गुंतवणूक ६८ लाखांनीं वाढली व व्यक्तींना दिलेलीं कर्जें २१ लाखांनी कमी झाली. सरकारी रोखे व बँकांतील ठेवी ह्यांतील रक्कम ४९ लाखांनीं उतरली. व्यवस्था खर्च वाढला आणि नफ्याची रक्कम घटली. एकूण नफा २,९८,४५५ रु. झाला. भागीदारांस ४% +१% बोनस =५% डिव्हिडंड मिळेल. बँकेच्या शाखाकचेऱ्यांची संख्या आतां ५२ झाली आहे. नव्या शाखांची मागणी सहा ठिकाणांहून आली आहे. ह्या शाखा प्रारंभीं तोट्यांत चालतील, ह्यासाठी सरकारी मदतीची मागणी करण्यांत आली आहे. श्री. वा. पुं. वर्दे ह्यांनीं ह्या वर्षीहि मॅनेजिंग डायरेक्टरचें काम विनावेतन केलें आहे. बँकेचें वसूल भांडवल आतां २०,२४,६०० रु. असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत २६,६५,००० रु. आहेत. एकूण खेळतें भांडवल ७,१२,५२,००० रु. आहे.

### बँकांच्या वार्षिक सभा

| | |
|---|---|
| २५—९—४७ | कल्याण पीपल्स को. बँक लि., कल्याण |
| २७—९—४७ | बॉंबे प्रॉ. को. बँक लि., मुंबई |
| २७—९—४७ | भुसावळ पीपल्स को. बँक लि., भुसावळ |
| २८—९—४७ | पुणें सें. को. बँक लि., पुणें |
| २८—९—४७ | पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., पुणें |
| २८—९—४७ | दि महाड को. अर्बन बँक लि., महाड |
| २८—९—४७ | दि सोलापूर डि. सें. को. बँक लि., सोलापूर |
| २८—९—४७ | सन्मित्र को. अर्बन बँक लि., मुंबई |
| २८—९—४७ | धुळें अर्बन को. बँक लि., धुळें |
| २८—९—४७ | दि मराठा मार्केट पीपल्स को. बँक लि., मुंबई |
| २८—९—४७ | धुळें अर्बन को. बँक लि., धुळें |
| २९—९—४७ | बॉंबे प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक लि., मुंबई |

### धुळें अर्बन को बँक लि., धुळें

बँकेकडील कर्जांची व कॅश क्रेडिटची बाकी १ लक्ष, १७ हजारांनीं वाढून ती ४ लक्ष १६ रु. झाली. ठेवींची रक्कम गत वर्षीपेक्षां थोडी कमी झाली आहे. बँकेस नफा १२,९५२ रु. झाला. भागीदारांस ६¼% डिव्हिडंड देण्यास ६,७८४ रु. लागतील. एकूण १०½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं शेअर भांडवल १,११,७४५ रु., रिझर्व्ह फंड ९,१७८४ रु. व इतर फंड ६४,४०२ रु. चे आहेत. मि. अहमद कमाल हे चेअरमन असून श्री. ए. एस. देशपांडे मॅनेजर आहेत.

### दि मराठा मार्केट पीपल्स को. बँक लि., मुंबई

गेल्या वर्षीपेक्षां अहवालाचे वर्षी ४०,४०२ रुपयांनीं जास्त कर्ज दिलें गेलें आहे. कॅश क्रेडिमध्येंहि वाढ झाली आहे. मालाचे तारणावरील कर्जाच्या योजनेचा सभासदांनीं अधिकाधिक फायदा घ्यावा अशी संचालकांची अपेक्षा आहे. अहवालाचे वर्षांत बँकेचे शेअर भांडवल ६३,५२० रु. चें ८१,५१० रु. झालें आणि रिझर्व्ह फंड १६ हजार रुपयांपर्यंत गेला. खेळते भांडवल ८ लक्ष, १९ हजारांचें ९ लक्ष, ७९ हजारांपर्यंत गेलें. ७,३४९ रु. नफ्यांतून ३–१२–० दरानें डिव्हिडंडला २,८२९ रु. लागतील.

### दि भुसावळ पीपल्स को. बँक लि., भुसावळ

वरील बँकेस १६ लाखांच्या खेळत्या भांडवलावर १९,००९ रु. नफा झाला आहे. रोख्यांच्या व्यवहारांतच ९,२६८ रु. नफा मिळालेला आहे. बँकेच्या वसुलीची परिस्थिति अत्यंत समाधानकारक आहे. दोन महिन्यांपेक्षां अधिक थकलेल्या कर्जांचें प्रमाण केवळ १·११% आहे. शेअर भांडवल, रिझर्व्ह फंड, पैशांचा तरतेपणा, इत्यादि दृष्टींनीं बँकेची परिस्थिति भक्कम आहे. जी. आय. पी. रेल्वेस माल पुरविणाऱ्या सभासदांस "डॉक्युमेंटरी ट्रेडबिल्स"चे आधारावर कर्जें देण्याचा नवा व्यवहार बँकेनें सुरू केला आहे. त्यांत १,०५,२५२ रु. गुंतलेले आहेत. श्री. हरि सदाशिव खरे, वकील, हे बँकेचे चेअरमन आहेत.

१ ऑक्टोबर रोजीं प्रसिद्ध होणार!

महाराष्ट्राचे व्यापारविषयक प्रमुख मासिक

किंमत १ रु. **व्यापार-उद्योग** वार्षिक वर्गणी १० रुपये.

* शेती, ग्रामोद्योग, बँका, विमाव्यवसाय, शेअरबाजार, व्यापारी बातम्या, सरकारी नियंत्रणें, निवेदनें, व्यापारविषयक कायदे, परराष्ट्रीय आर्थिक घडामोडी, नवीन बाजारपेठा, राष्ट्रीय प्रगतीच्या योजना इ. माहितीचें खास

**व्यापारी वर्गाला उपयुक्त मासिक**

सल्लागारः प्रो. दे. रा. धारपुरे — व्यवस्थापकः मोहाडीकर बंधू

* आजच वर्गणीदार व्हा * गांवोगांव एजंट नेमणे आहेत.

* जाहिरातीचे दराची चौकशी करा.

लिहाः व्यवस्थापक, 'व्यापार उद्योग', १० गंगानिवास, रानडे रोड, दादर, मुंबई १४.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

सात्ताहिक बंद भाव


| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १६।९।४७ | बुधवार १७।९।४७ | गुरुवार १८।९।४७ | शुक्रवार १९।९।४७ | सोमवार २२।९।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६१७-८; २५२७-८ | १००-१३-४ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | १५९५ | १६०७-८ | बाजार बंद | बाजार बंद | १६५५ |
| ६३८; ४५७-८ | १९-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३२७ | ३२९ | | | ३३६ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगॉल स्टील | १० | २५ | २५ | | | २५-१२ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३१-१४ | ३१-१४ | | | ३२-१० |
| ३२७६; २१३२-८ | १२-८-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | ९६१-४ | ९९५ | | | १०३५ |
| ११८०; ६५८ | ६-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५२४ | ५३७ | | | ५४८ |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५३७ | ५४८ | | | ५७६ |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | २७२ | २७६ | | | २८५ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | २८० | २८५ | | | २९२ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २९८ | ३०२ | | | ३११ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २११ | २१८ | | | २२४ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१२ | ३-१४ | | | ३-१५ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-८ | १४-१२ | | | १५-३ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्डस् | १ | २-९ | २-११ | | | २-१२ |
| ७९२-८; ७३५ | २१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५२६-४ | ५३५ | | | ५५० |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १५६-१२ | १५७-४ | | | १६० |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २५३ | २५६ | | | २५९ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४४५ | ४५२-८ | | | ४६७-८ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | २९-१४ | ३०-१ | | | ३०-९ |


-सर्व प्रांतांतील-
सुती - गरम - रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार




साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें।

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, पुणें.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल:— | रु. ५०,००,००० |
| खपलेलें भांडवल:— | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल:— | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड:— | रु. ३,९०,००० |
| एकूण खेळतें भांडवल:— | रु. २,००,००,००० |

—:बोर्ड ऑफ डायरेक्टर्स:—

श्री. धों. कृ. साठे, (चेअरमन) श्री. वा. पुं. वर्दे (व्हा. चेअरमन)
श्री. न. गं. पवार, श्री.श्री. गो. मराठे, श्री.मा. रा. जोशी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा वि. शहा,
श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुत्ते,
श्री. मो. रा. ढमढेरे.

शाखा:—डेक्कन जिमखाना (पुणें), खडकी, मुंबई (फोर्ट), मुंबई (गिरगांव), नाशिक, चाळीसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर (पे. ऑफिस), नागपूर (सिताबर्डी), नागपूर (इतवारी), रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कल्याण इ.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शिवाय ट्रस्टी आणि एक्झिक्यूटरचे व्यवहाराबावत चौकशी करावी.

चिं. वि. जोग
मॅनेजर.













# पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ११ |

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा: डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिस:—पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिस.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. १५,४३,८१० |
| विकी झालेलें भांडवल ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमन:—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.